जा.क्र.निवडणूक/अधिसूचित सह.संस्था/निवडणूक मानधनं/२०११
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
पुणे-१ यांचे कार्यालय. दिनांक :-१७ ऑक्टोबर, २०११

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**विषय :- अधिसुचित सहकारी संस्थांच्या निवडणूकीच्या प्रयोजनार्थ नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी/सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाच्या मानधनाबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे वरील विषयाचे दिनांक २६ एप्रिल २०११ चे परिपत्रक

**-: परिपत्रक :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ५६ अ अन्वये अधिसूचित सहकार संस्थांच्या (कलम ७३ एक क) निवडणूका घेण्याची जबाबदारी निबंधक या नात्याने या कार्यालयाच आहे. या निवडणूका नियंत्रित करण्याचा अधिकार निबंधकांना आहे त्यानुसार खालीलप्रमाण परिपत्रकीय सूचना देण्यात येत आहेत.

अधिसूचित सहकारी संस्थांच्या निवडणूकीकामी नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निर्ण अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतमोजण अधिकारी, शिपाई इ. यांना द्यावयाच्या मानधन/परिश्रमिकाबाबत या कार्यालयाने उपरोक्त संदर्भि परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या होत्या. त्यात बदल करुन पुढीलप्रमाणे सुधारीत परिपत्रकीय सुच निर्गमित करण्यात येत आहेत.

**१) जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणू निर्णय अधिकारी यांना मानधनदेणेबाबतची अनुसूची**

| अ. क्र. | पदनाम | अधिसूचित विविध कार्यकारी सहकारी संस्था | अधिसुचित नागरी सहकारी पतसंस्था, नागरी सहकारी बँका, व इतर अधिसूचित सहकारी संस्था . | |
|---|---|---|---|---|
| | | | निवडणूक बिनविरोध झाल्यास | मतदान झाल्यास |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी | मूळ वेतनाच्या १०% | मूळ वेतनाच्या २५% | मूळ वेतनाच्या २५% |
| २ | निवडणूक निर्णय अधिकारी | मूळ वेतनाच्या १०% | मूळ वेतनाच्या २५% | मूळ वेतनाच्या ५०% |
| ३ | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी | ------------ | मूळ वेतनाच्या २५% | मूळ वेतनाच्या ५०% |

**२) संपुर्ण निवडणूकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष , मतदान अधिकारी, मतमोजणी अधिकारी, मतदान कर्मचारी व शिपाई यांना खालीलप्रमाणे मानधन देण्याबाबतची अनुसूची**

| | | |
|---|---|---|
| १. | मतदान केद्राध्यक्ष | रु. १०००/- |
| २. | मतदान अधिकारी / मतमोजणी अधिकारी | रु. ७५०/- |
| ३. | मतदान कर्मचारी / शिपाई | रु. ५००/- |

३) तोटयातील अधिसुचित विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी मानधन घेण्यात येवू नये.

४) विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकां-याची नेमणूक करण्यात येवू नये .

५) ५००० सभासद संख्येपेक्षा कमी सभासद संख्या असणाऱ्या अधिसूचित सहकारी संस्थेच्या निवडणूकीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक केली असेल तरी त्यांना निवडणूक मानधन अदा करता येणार नाही.

६) जिल्हा उपनिबंधक तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या व्यतिरिक्त त्यांच्या कार्यालयातील इतर अधिकारी/कर्मचारी हे अधिसुचित सहकारी संस्थांच्या निवडणूकीच्या बाबतीत कोणतेही मानधन घेण्यास पात्र असणार नाहीत.

७) सदरचे परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापासून होणाऱ्या निवडणूकांस लागू राहील.

याबाबतचे या कार्यालयाचे पूर्वीचे सर्व परिपत्रके रद्द करण्यात येत आहेत.

उपरोक्त परिपत्रकीय सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांची राहील. सदर सुचनांचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई करण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**( मुधकर चौधरी )**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**